1306/2024

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभवन' डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१

## सामान्य प्रशासन विभाग

E-mail - smcgados2@gmail.com

जा.क्र/सआस/कक्ष-१/आस्था-१/ ५८७ दि. ०८/ ०३ /२०२

## जाहिरात

## Walk - In – Interview

**दिनांक :- 13/03/2024 वेळ: दुपारी 01:00 वाजता**

**( अर्ज स्विकारण्याची वेळ :- सकाळी 10:00 ते 12:00 )**

**स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर**

सोलापूर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) अंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणाकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मदत करण्याकरीता खालील तक्त्यात नमूद पदे केवळ तात्पुरत्या कंत्राटी पध्दतीने 11 महिन्याच्या कालावधीकरीता पदासमोरील नमूद शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून दरमहा एकवट मानधनावर Walk- In - Interview व्दारे भरण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | शहर समन्वयक (City co-Ordinater) | 02 | मान्यता प्राप्त विद्यापीठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी,<br>1. बी.ई/बी.टेक. (कोणतीही शाखा)<br>2. बी.आर्क,<br>3. बी.प्लॅनिंग<br>4. बी.एस.सी. (कोणतीही शाखा) | र.रु.45,000/- (दरमहा) |

**अटी व शर्ती :-**

1. सोबतच्या नमून्यातील परिपुर्ण भरलेला अर्ज उमेदवाराने सदर कालावधीमध्ये अर्ज सादर करावा. समक्ष हार्ड कॉपीमध्ये सादर

06/2024

2. जन्म तारखेचा दाखला, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, विहीत करणेत आलेली शैक्षणिक अर्हता पूर्ण झालेली प्रमाणपत्रे, इत्यादी अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.(स्वयंम सांक्षांकित Self Attested)
3. अनुभव :- स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडित कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे. स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत काम केलेल्या उमेदवारांना प्राधान्य राहील.
4. वयोमर्यादा :- कमाल वयोमर्यादा 35 वर्षे (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथील करता येईल)
5. अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारास मुलाखतीस बोलविणेत येईल. याबाबतची माहिती म.न.पा.चे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. त्याकरिता पात्र उमेदवारास वेगळा पत्रव्यवहार करणेत येणार नाही.
7. उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.
8. नियुक्ती संदर्भात अंतिम अधिकार अध्यक्ष तथा आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांना राहतील आणि निवड / नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार त्यांनी राखून ठेवले आहे.
9. सदरची भरती प्रक्रिया हि सेवाप्रवेशास अनुसरुन केलेली नसल्याने आपणास कायम सेवेचा हक्क सांगता येणार नाही व कायम सेवकाप्रमाणे कोणतेही लाभ लागू राहणार नाहीत.
10. सदरची नियुक्ती 11 महिन्यासाठी केवळ तात्पुरत्या स्वरुपात व एकवट मानधनावर राहील. उपरोक्तचा कालावधी संपल्यानंतर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

Signed by
Sheetal Basavaraj Teli Ugale
Date: 06-03-2024 19:57:23

(शीतल तेली-उगले भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका